# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

क्रमांक संगाबाअवि/संपमूमं/१२९/२०२१
दिनांक : ३०.०३.२०२१

प्रति,

प्राचार्य/मानद संचालक/विभागप्रमुख
सर्व संलग्नित महाविद्यालये/मॉडेल डीग्री कॉलेज/विद्यापीठ शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : हिवाळी-२०२० परीक्षांच्या सम सत्रांच्या (माजी विद्यार्थ्यांच्या) महाविद्यालयीन स्तरावर परीक्षा संचालनाबाबत...**

**संदर्भ : (१) निदेश क्र.५/२०२१**
**(२) या कार्यालयाचे पत्र क्र.संगाबाअवि/३/संपमूमं/११८/२०२१, दिनांक १९.३.२०२१**
**(३) या कार्यालयाचे पत्र क्र.संगाबाअवि/संपमूमं/१२६/२०२१, दिनांक २६.३.२०२१**

महोदय/महोदया,

कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील हिवाळी-२०२० च्या परीक्षांचे संचालन संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केल्यानुसार निदेश क्र.५/२०२१ च्या तरतूदींनुसार संदर्भ क्र.२ व ३ मधील पत्रात दर्शविलेल्या सूचनांच्या अनुषंगाने आयोजीत करावयाच्या आहेत. निदेशातील तरतूदी स्वयंस्पष्ट असूनही काही महाविद्यालयांद्वारे माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षा संचलनासंदर्भात प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्या सोडविण्याबाबतची माहितीची विचारणा होत आहे. त्यादृष्टीने खालीलप्रमाणे माहिती पुनश्च आपल्या कार्यवाहीस्तव रेखांकित करण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक १ मधिल निदेश क्र.५/२०२१ मधिल माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षांच्या माहितीच्या अनुषंगाने (अ) परीक्षा पद्धती अंतर्गत **परिच्छेद (११)** व **(क) प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्या सोडविण्याबाबत माहिती अंतर्गत स्पष्ट सूचना दिलेल्या आहे. त्या पुनःश्च खालील प्रमाणे विशद करण्यात येत आहे.**

“११) शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील हिवाळी-२०२० च्या सम सत्रांच्या (अंतिम वर्ष/अंतिम सत्र वगळून) परीक्षा संबंधीत महाविद्यालयाच्या/विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांच्या स्तरावर घ्यावयाच्या आहेत, त्याकरीता वेळापत्रक व बहुपर्यायी (M.C.Q.-Multiple Choice Question) स्वरुपात प्रश्नपत्रिका महाविद्यालयांना/विद्यापीठ शैक्षणिक विभागाना/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांना त्यांचे स्तरावर “प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व सोडविण्याबाबतची माहिती” या शिर्षांतर्गत दर्शविल्याप्रमाणे तयार करावयाच्या आहेत. ”

**क) प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व सोडविण्याबाबतची माहिती :-**

२४) प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये संपूर्ण अभ्यासक्रमांवर आधारित प्रत्येक युनिटवर साधारणतः समान संख्येने बहुपर्यायी (M.C.Q.- Multiple Choice Question) स्वरुपात एकुण ४० प्रश्न राहतील. त्यापैकी ३० प्रश्न विद्यार्थ्यांना **(ऑनलाईन/ऑफलाईन)** सोडविणे बंधनकारक राहील.
२५) प्रत्येक प्रश्नाला प्रत्येकी दोन गुण राहतील.
२६) परीक्षेचा कालावधी हा प्रत्येक प्रश्नपत्रिकेकरीता ६० मिनीटांचा राहील (एक तास)
२७) चुकीच्या उत्तरांसाठी Negative marking पद्धती असणार नाही.

माजी विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षांचा कालावधी (संदर्भ क्र. २ व ३ वरील पत्राच्या अनुषंगाने) खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रात्याक्षिक परीक्षेचा कालावधि | लेखी परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी व तांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सम सत्र **(दुसरे व अंतिम सत्र वगळून) (महाविद्यालय स्तरावर)** | -- | दिनांक ०६.०४.२०२१ ते १०.०४.२०२१ (दुसरे व अंतिम सत्र वगळून) |
| २ | अ.क्र. १ वरील परीक्षांव्यतिरीक्त उर्वरीत अभ्यासक्रमांचे सम सत्र **(अंतिम वर्ष/ अंतिम सत्र वगळून) (महाविद्यालय स्तरावर)** | दिनांक १५.०४.२०२१ ते २०.०४.२०२१ | दिनांक ०७.०४.२०२१ ते १२.०४.२०२१ |

**(कृपया मागे पहा)**

तसेच विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्याबाबतची कार्यपद्धती संदर्भ क्र.१ वरील निदेश क्र.५/२०२१ मधील "इ) परीक्षांचे निकाल जाहीर करण्याबाबतची कार्यवाही" अंतर्गत नमूद केल्यानुसार राहील.

**अत्यंत महत्वाचे :** **हिवाळी-२०२० च्या परीक्षांचे निदेश क्र.५/२०२१ मधिल तरतूदींच्या अनुषंगाने महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षा आटोपल्यानंतर विद्यार्थ्यांचे प्रचिलत पद्धतीने गुण सादर करण्यासोबतच सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिकेची प्रत्येकी एक प्रत व त्यासोबत Answer Key जोडून विद्यापीठाचे केंद्रीय मुल्यांकन कार्यक्रम केंद्रावर परीक्षानिहाय/सत्रनिहाय सादर करण्यात याव्यात. अन्यथा विद्यार्थ्यांचे निकाल घोषीत करण्यात येणार नाहीत.**

आपला,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव :**

(१) सहाय्यक कुलसचिव (गोप)
(२) सहाय्यक कुलसचिव (परीक्षा/चौकशी)
(३) सहाय्यक कुलसचिव (परीक्षा)
(४) सहाय्यक कुलसचिव (संपमूमं.)